पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क्र.आ कक्ष /१८५/ २०१६
दि. २७/१२ / २०१६

विषय :अंदाजपत्रकीय तरतुद वर्गीकरणाबाबत...

परित्रक,

दिवसें दिवस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा खर्च वाढत असून उपलब्ध् निधी कमी व मागणी जादा अशी परिस्थिती दिसून येते. चालू वर्षामध्ये मोठया प्रमाणावर अंदाजपत्रकीय तरतुद वर्गीकरणाचे प्रस्ताव प्राप्त झाले असून, अशा प्रस्तावांची पडताळणी केली असता अंदाजपत्रक २०१६-१७ मध्ये तरतुदी केलेल्या आहेत. तथापी कामांवर खर्च झालेला नाही अशी बरीचशी कामे दिसून येतात. अशा अखर्चित तरतुदी राहण्याचे समर्पक स्पष्टीकरणे बहुताश वर्गीकरणांच्या प्रस्तवांत नमूद नसतात, तसेच याबाबत कोण जबाबदार आहे ते देखील स्पष्ट केलेले नसते. त्याचप्रमाणे अशा अखर्चीत तरतुदींचा वापर कोणत्या कामावर, कोणत्या विभागासाठी करावयाचा याचा निर्णय आयुक्तांनी घ्यावयाचा आहे. अपवादात्मक परिस्थिती खेरीज अखर्चित रक्कमाबाबतचे वर्गीकरणाचे प्रस्ताव येणे अपेक्षीत नाही याची नोंद घ्यावी व प्रस्ताव पाठवतांना अखर्चीत रहणा-या रकमांकरिता कारणे / कोण जबाबदार आहे ते नमूद करावे.

अंदाजपत्रक तयार करतांना विकास कामांकरिता ढोबळ मानाने तरतुदी दिल्यानंतर विभागांमार्फत हाती घ्यावयाची कामे सुचविली जातात. अशी कामे सुचविताना विभागांकडून देयकांच्या प्रदानासाठी आवश्यक असणा-या तरतुदी त्या कामासाठी केल्या असल्याची असल्याची खातरजमा करुनच विभागांनी कामे सुचवावीत. पुरेशी तरतूद न करता कामे प्रस्तावित केल्यास व देयकांच्या प्रदानास अडचणी निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत विभाग प्रमुखांची राहील व अपवादात्मक परिस्थिती वगळता अशा प्रकरणी वर्गीकरणांचे प्रस्ताव मंजुर केले जाणार नाहीत. यांची सर्व विभाग प्रमुखांनी नोंद घ्यावी.

सदरचे परिपत्रक सर्व संबंधितांचे निदर्शनास आणून द्यावे व त्या प्रमाणे कार्यवाही करावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८